# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 March 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ मार्च २०२५ दुपारी १.०० वा.**

****

सशक्त ग्राहक हा मजबूत अर्थव्यवस्थेचा पाया आहे. ग्राहकांच्या हक्कांचे रक्षण करणाऱ्या आणि सर्वांसाठी चांगले भविष्य घडवणाऱ्या शाश्वत जीवनशैलीसाठी आपण वचनबद्ध होऊ या असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. आज जागतिक ग्राहक दिनानिमित्त त्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या. ग्राहक म्हणून आपण सदैव जागरूक आणि सतर्क राहणं गरजेचं असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. कोणतीही वस्तू खरेदी करताना वस्तूंचे दर, मुदत संपण्याची तारीख, वजन इत्यादी गोष्टी तपासून पाहणं आणि पावती घेणं आवश्यक असल्याचंही ते म्हणाले.

****

राज्यातील सर्व शाळांमध्ये १ ली ते ९ वी इयत्तांसाठी वार्षिक परीक्षा, संकलित मूल्यमापन पॅट चाचण्या एकाच वेळी घेण्याचा निर्णय शासनानं निर्गमित केला आहे. त्यानुसार शाळांनी ८ ते २५ एप्रिल दरम्यान या परीक्षा आणि चाचण्या घ्यायच्या आहेत. मात्र, यासंदर्भात अनेक अडचणी असून २५ एप्रिलपर्यंत परीक्षा घेण्याचं वेळापत्रक कोणत्याही दृष्टीने सुसंगत नसल्यानं संदर्भित आदेश रद्द करून प्रचलित पद्धतीनुसार परीक्षांचे वेळापत्रक ठरवण्याचं नियोजन शाळा स्तरावरच असावं अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीनं राज्याचे शिक्षण आयुक्तांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सर्व स्पर्धा परीक्षा आता मराठीतून होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ही घोषणा केली. राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा मराठी आणि इंग्रजीतून होतात, कृषी

अभियांत्रिकी सारख्या काही परीक्षा केवळ इंग्रजी भाषेतून घेतल्या जाव्यात, असे निर्देश न्यायालयाने दिले होते. या विषयांचे पाठ्यपुस्तकं मराठीतून उपलब्ध नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. याबाबत विचारविनिमयाअंती, क्षणिक धोरणानुसार आता ही पाठ्यपुस्तकं मराठीतून उपलब्ध केली जातील आणि ती उपलब्ध झाली नाहीत तर नवीन साहित्याच्या आधाराने परीक्षा मराठीतून घेतल्या जातील, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

****

पंताप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० मार्च रोजी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रम मालिकेचा १२० वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरिकांना आपले विचार आणि सूचना १८००-१-७८०० या नि:शुल्क क्रमांकावर देता येणार आहेत. नरेंद्र मोदे ॲप किंवा माय जीओव्ही ओपन फोरमच्या माध्यमातूनही ऑनलाईन पद्धतीनं नागरिकांना आपले विचार आणि सूचना पंतप्रधानांपर्यंत पोहोचवता येतील. या सूचना येत्या २८ तारखेपर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत.

****

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका, तसंच जिल्ह्यातील नवनिर्मित आणि मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभाग रचना झाल्यामुळे निवडणुका न होवू शकलेल्या ग्रामपंचायती तसंच २८ फेब्रुवारी २०२५ अखेर रिक्त झालेल्या सदस्य आणि थेट सरपंच पदांच्या पोटनिवडणुकीसाठी पारंपारिक पद्धतीने मतदार यादीचा कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली आहे.
सार्वत्रिक निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये अहमदपूर तालुक्यातील रुई, राळगा व वरवंटी या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

****

लातूर जिल्ह्यातील विविध १४ पोलिस स्थानकांमध्ये ४३७ वाहनं बेवारस स्थितीत आहेत. या वाहनांवर ज्या कोणाची मालकी असेल, त्यांनी १५ दिवसांत मालकी हक्कविषयक कागदपत्रासंह संबंधित पोलिस ठाण्यात संपर्क साधण्याचं आवाहन लातूर पोलिस विभागानं केलं आहे. विहीत मुदतीत कोणाचेही मालकी हक्क सिद्ध न झाल्यास कोणाचीही तक्रार नाही, असं गृहीत धरुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असं पोलिस प्रशासनाने कळवलं आहे.

****

रेल्वे विभागाने होळीच्या सणासाठी प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन हडपसर आणि हिसार दरम्यान होळी विशेष रेल्वेगाड्यांच्या अतिरिक्त चार फेऱ्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

हडपसर–हिसार ही १७ तारखेपर्यंत चालणारी विशेष रेल्वेगाडी आता २४ आणि ३१ तारखेलाही धावेल तर हिसार–हडपसर विशेष ही तारखेपर्यंत चालणारी रेल्वेगाडी २३ आणि ३० तारखेलाही धावणार आहे.

****

महिला प्रीमियर लीग क्रिकेटच्या अंतिम सामन्यात आज मुंबई इंडियन्सची लढत दिल्ली कॅपिटल्सशी होईल. हा सामना मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरू होईल.

****